दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागर राणा अंभोरे
RNI No - MHMUL/25/A0788
वाशीम ■ शनिवार, १६ मे २०२६ ■ वर्ष : ३ ■ अंक : २९ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

## भारतीय स्टेट बँक ग्रामीण स्वय रोजगार प्रशिक्षण संस्था वाशिमच्या वतीने कोठारी येथे कृषी उद्यमी प्रशिक्षण संपन्न

महाराष्ट्र जीत

**वाशिम (प्रतिनिधी) :** भारतीय स्टेट बँक ग्रामीण प्रशिक्षण संस्था वाशिम च्या वतीने कृषी उद्यमी हे प्रशिक्षण 30 एप्रिल 2026 ते 12मे 2026 अशा 13 दिवसीय प्रशिक्षण कोठारी ता. मंगरूळपीर या ठिकाणी घेण्यात आले . या प्रशिक्षणामध्ये एकूण 35 बचत गटातील महिलांनी सहभाग घेतला होता.या प्रशिक्षण दरम्यान प्रशिक्षणार्थ्यांना वेगवेगळ्या प्रकारचे माती परीक्षण, बी,बियाणे कसे तयार करायचे,गांडूळ खत निर्मिती कशी करायची, दुग्ध व्यवसाय कसा करायचा किंवा स्वतः‌ची व्यवसायाची तयारी कशी सुरु करायची किंवा शेळी पालन कशा पद्धतीने करायचे, रासायनिक शेती आणि सेंद्रिय शेती यामध्ये काय फरक आहे.सेंद्रिय शेतीकडे शेतकऱ्यांनी कसे वळले पाहिजे, घरच्या घरी कमीत कमी खर्चात शेती कशी केली पाहिजे. जास्तीत जास्त पीक उत्पादन करण्यासाठी किंवा वेगवेगळ्या प्रकारच्या जे पीक आहेत जसे की खरीप आणि रब्बी पिकांमधला फरक काय आहे. असे वेगवेगळ्या प्रकारचे घटक शेतकऱ्यांना समजून सांगितले .प्रमुख मार्गदर्शक म्हणून गिरी सर होते. तसेच वनिता सुभाष साबळे मॅडम (व्याख्याता) SBI-RSETI Washim यांनी बँकिंग बद्दल तसेच उद्योजकीय सक्षमता कशा पद्धतीने व्यवसायिकांमध्ये असणे आवश्यक आहे.याबद्दल मार्गदर्शन केले, तसेच उद्योजक आणि नोकर यामध्ये मुख्य फरक काय आहे. आणि उद्योजकाने उद्योगाकडे कसे वळले पाहिजे. याबद्दलचे सखोल मार्गदर्शन केले .तसेच ग्रामीण रोजगार प्रशिक्षण संस्थेचे संचालक आदरणीय धनाजी बोईले सर यांनी प्रशिक्षणा दरम्यान वेगवेगळ्या प्रकारच्या सोयी सुविधेबद्दलचे मार्गदर्शन केले . तसेच विमा बद्दल सुद्धा मार्गदर्शन केले .प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षणार्थ्यांना चहा,नाश्ता, जेवण तसेच वेगवेगळ्या प्रकारचे स्टेशनरी साहित्य वाटप




करण्यात आले आहे.क्षेत्रभेट वंजारी यांच्या गोट फॉर्मला देण्यात आली होती. प्रकल्प अहवाल कसा तयार करायचा आणि तो लोन साठी किती उपयुक्त आहे, याबद्दलची सखोल मार्गदर्शन अधिव्याख्यात्या वनिता सुभाष साबळे मॅडम यांनी दिली आहे SBI RSETI Washim ते संचालक यांनी असे आवाहन केले की वेगवेगळ्या प्रकारचे प्रशिक्षण वाशिम या ठिकाणी घेण्यात येतात जसे की मोबाईल रिपेरिंग ,व्हिडिओग्राफी ,मशीन क्लास ,ब्युटी पार्लर ,वस्त्र चित्रकला ,मोटर रिवायडींग अशा पद्धतीच्या प्रशिक्षणांना आपल्या आसपासचे जवळचे घरातले १८ ते ४५ वयोगटातील ग्रामीण भागातील गरजूवंत प्रशिक्षणार्थींना पाठवावेत असे आवाहन केले. संपर्क दूरध्वनी 90 22 85 45 52. या नंबर वर ग्रामीण भागातील गरजूवंत युवक युवतींनी लाभ घ्यावा. या प्रशिक्षणाच्या यशस्वीतेसाठी कार्यालय सहायक योगेश चौव्हाण, तेजश्री निचडे मॅडम व्याख्याते संजय खिल्लारी सर, शेवक महेंद्र सम्रत व महादेव भोयर यांनी मोठे सहकार्य केले. बाह्य परीक्षक म्हणून डॉ. काळे सर, ताजने सर हे उपस्थित होते.

# 'नीट' पुनर्परीक्षेची तारीख जाहीर

महाराष्ट्र जीत

वैद्यकीय प्रवेश घेण्यासाठी इच्छुक असणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (NTA) नीट (NEET UG २०२६) पुनर्परीक्षेची अधिकृत तारीख जाहीर केली असून, ही परीक्षा रविवार, २१ जून २०२६ रोजी घेण्यात येणार आहे. पेपरफुटीच्या आरोपांनंतर ३ मे रोजी झालेली मूळ परीक्षा रद्द करण्यात आली होती. आता नव्या वेळापत्रकानुसार भारतासह परदेशातील परीक्षा केंद्रांवर पुनर्परीक्षा पार पडणार आहे. यावेळी काही नियमांमध्येही बदल जाहीर करण्यात आले आहेत.

**ॲडमिट कार्ड्स १४ जूनपर्यंत**

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पुनर्परीक्षेसाठी आवश्यक असणारे ॲडमिट कार्ड्स १४ जूनपर्यंत जारी केले जातील, अशी माहिती दिली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वी जवळपास एक आठवड्याचा अतिरिक्त कालावधी तयारीसाठी मिळणार आहे. पुनर्परीक्षेसाठीचे सुधारित ॲडमिट कार्ड्स अधिकृत नीट (NEET) संकेतस्थळावर उपलब्ध असेल. विद्यार्थी अर्ज क्रमांक आणि जन्मतारीख वापरून हॉल तिकीट डाउनलोड करू शकतील.

**परीक्षा केंद्राचे शहर पुन्हा**



**निवडण्याची संधी**

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी विद्यार्थ्यांना पुनर्परीक्षेसाठी पसंतीचे परीक्षा केंद्र पुन्हा निवडण्याची संधी दिली जाईल, असे सांगितले. यासाठी विद्यार्थ्यांना एक आठवड्याचा कालावधी दिला जाणार आहे. मागील परीक्षेदरम्यान प्रवासाशी संबंधित अडचणींचा सामना करावा लागलेल्या विद्यार्थ्यांना याचा फायदा होण्याची शक्यता आहे.

**OMR शीटसाठी अतिरिक्त १५ मिनिटांचा वेळ**

परीक्षा प्रक्रियेत यावेळी महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. याआधी NEET UG परीक्षेसाठी वेगळा अतिरिक्त वेळ अधिकृतपणे दिला जात नव्हता. संपूर्ण परीक्षा ३ तासांची (१८० मिनिटे) असायची आणि त्याच वेळेत प्रश्न सोडवणे व OMR शीट भरणे अपेक्षित होते.

आता पुनर्परीक्षेत OMR शीट भरण्यासाठी अतिरिक्त १५ मिनिटांचा वेळ देण्याची घोषणा करण्यात आली आहे.

## भाजयुमो चे अमित जाधव यांच्या गाडीचा अपघात

महाराष्ट्र जीत

**नाशिक : प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अमित जाधव यांच्या इनोव्हा हैक्रॉस गाडीला गुरुवार दिनांक १४ मे च्या मध्यरात्रीनंतर नाशिकमध्ये अपघात झाला. रात्री पावणेदोनच्या सुमारास मंत्री महोदय यांना रेल्वे स्टेशन कडे सोडण्यासाठी जात असताना हा अपघात घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, मोटर सायकल स्वार अचानक आल्याने त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात गाडी रस्त्याच्या



मधील डिव्हायडरवर जाऊन आदळली. यात अमित जाधव व चालक थोडक्यात बचावले. जाधव यांना नाशिक येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले अपघातात गाडीचे मोठे नुकसान झाले असून घटनास्थळी काही काळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती.

## PSI अनिल गावंडे यांचा सामाजिक कार्यकर्ते कडुन सत्कार

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत : प्रशांत ठाणे :** गणेशपूर येथील शेतकरी कुटुंबातील सुपुत्र अनिल ज्ञानेश्वरराव गावंडे यांनी मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर PSI परीक्षा उत्तीर्ण करून पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदावर नियुक्ती मिळवली. त्यांच्या या यशाबद्दल सामाजिक कार्यकर्ते बिमोद मुधाने व दिगंबर महल्ले यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन शाल, पुष्पगुच्छ व भारतीय संविधानाचे पुस्तक देऊन सत्कार केला. यावेळी PSI अनिल गावंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, प्रशासकीय सेवेत यायचे असेल तर जिद्द, चिकाटी आणि सातत्य अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून त्यासाठी सातत्याने मेहनत घेतली पाहिजे.



तसेच त्यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, भाऊ आणि पत्नी अश्विनी यांना दिले. दारव्हा तालुक्यातील व परिसरातील विद्यार्थ्यांना कधीही मार्गदर्शन व मदतीची आवश्यकता भासल्यास आपण नेहमी तत्पर राहू, असे आश्वासनही त्यांनी दिले. PSI अनिल गावंडे यांना पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!आपले यश अनेक युवकांसाठी प्रेरणादायी ठरो हीच सदिच्छा.

# डॉ बाबासाहेबांचा अर्धपुतळा भेट देऊन लग्नाचा वाढदिवस उत्साहात साजरा !!

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी प्रांजली काळबेंडे :** नुकताच "मुंबईचे सुप्रसिद्ध संविधान प्रबोधनकार दाम्पत्य" श्री व सौ मालिनी विलास गोरेगावकर यांच्या चुनाभट्टी निवासस्थानी, छत्रपती मुस्लिम ब्रिगेड महाराष्ट्र अध्यक्ष आकीफ दफेदार, सामाजिक कार्यकर्ते सुनील यादव, सामाजिक कार्यकर्ते संजय चव्हाण, शब्दश्री विलास देवळेकर आणि श्री व सौ खराटे उपस्थित होते. यांनी मिळून अचानक सदिच्छा भेट दिली. ह्या प्रसंगाचे औचित्य साधून, देवळेकर यांनी अगोदरच 'अनेक



समूहात' सकाळीच गोरेगावकर दाम्पत्याच्या नावाने "३६व्या लग्नाची कविता" सादर केली होतीच. पण आता, त्यांनी सर्वांसमक्ष गोरेगावकर कुटुंबाच्या 'सुख- समाधान- निरोगी आयुरारोग्य' लाभण्यासाठी, आपल्या "म्युझिकल इक्को साऊंड सिस्टीम मध्ये मालवणी गाऱ्हाणा" सादर केला. त्यास उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात कौतुकाचा उत्तम प्रतिसाद दिला. त्यानंतर दफेदार यांनी "मायेची शाल" दोघांनाही घातली. त्यानंतर देवळेकर यांनी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा "अर्धपुतळा छोटी मूर्ती व माणुसकीची शाल" दोघांनाही देत आणि उपस्थित सर्वांना एक कविता संग्रह पुस्तक भेट दिली. त्यानंतर, प्रत्येक मान्यवरांनी थोडक्यात 'शुभेच्छा' दिल्या. आणि चव्हाण यांनी "मिठाई व प्रेमाचं प्रतीक म्हणून मोठं पुष्पगुच्छ" देऊन, अभिनंदन केले. असं प्रत्येकाने खारीचा वाटा उचलून श्री व सौ मालिनी विलास गोरेगावकर यांच्या लग्नाचा ३६वा वाढदिवस "घरगुती उत्साहात" साजरा करण्यात आला. त्यानंतर गोरेगावकर यांच्या मुलाने 'आदरतिथ्य अल्पोपहार' देत असताना, संविधान आणि सामाजिक विषयांवर चर्चाही झाली. ह्या दरम्यान देवळेकर यांनी "१४ एप्रिल रोजी चे तीन विशेषांक" सर्वांना भेट दिली. त्यामुळे खेळीमेळीच्या वातावरणात अनपेक्षित असा "३६वा वाढदिवस" साजरा करण्यात आला. आणि ह्या "सोहळ्याचे श्रेय आयोजक संजय चव्हाण" यांनी उत्तम पद्धतीने केले आहे.



महाराष्ट्र जीत

**दोनच राजे होऊन गेले या पुण्य भूमीवर एक त्या रायगडावर एकत्या चौदार तळ्यावर अशा स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पावन भूमीत रायगडावर " खातोत्या भाकरीवर बाबासाहेबांची सही आहे रे " या गीताचे गीतकार लेखक शाहीर मनोज राजे गोसावी अमरावती यांची रायगडावर ग्रेट भेट झाली व जून्या आठवणीला उजाळा मिळाला तो आनंदाचा रायगडावरील क्षण प्रसंगी शाहीर मनोज राजे गोसावी, बुलडाणा जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया आठवले गटाचे संपर्क प्रमुख पत्रकार बाबासाहेब जाधव, पैठण येथील फीटइंडीयाचे सल्लागार शिवकांत नवथर, रिपाईंचे प्रसिद्धी प्रमुख तथा फइंडीयाचे सुपरवायझर वैभव सिरसाठ यांनी शाहीर मनोज राजे यांना " खातोत्या भाकरीवर बाबासाहेबाची सही आहे रे " या गाण्या बद्दल पुढील भावी आयुष्य साठी शुभेच्छा दिल्या**

## साने संगीत लोककला मंच ऊरूळी कांचन पुणे यांना संगीत कलेचा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

महाराष्ट्र जीत

**पुणे(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) :** खिल भारतीय मराठी साहित्य परिषद, कला गोविंद शिक्षण प्रसारक मंडळ व पोलिस मित्र संघ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक 10/ 5/2026 रोजी सकाळी 10 वाजता आठवे कवी संमेलन, पुस्तक प्रकाशन व पुरस्कार वितरण सोहळा 2026 पुण्यातील ऊरुळी कांचन येथील महात्मा गांधी विद्यालय रविंद्र कला मंदिर येथे पार पडला. कवी संमेलनाचे अध्यक्षस्थान म्हणून राष्ट्रपती पोलीस पदक विजेते व अभिनेते, सुप्रसिद्ध कवी श्री सिताराम नरके यांनी भुषविले. कार्यक्रमाची सुरवात दीपप्रज्वलनाने व महात्मा फुले व सावित्रीबाई फुले या महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. महात्मा गांधी सर्वोदय संघाचे सचिव श्री सोपान (बापू) कांचन



विश्वस्त श्री महादेव कांचन , राजाराम कांचन जेष्ठ साहित्यिक श्री सुर्यकांत नामुगडे सर शिक्षण व क्रीडा जि. प . पुणे सदस्य सौ सुरेखा हरगुडे महात्मा गांधी विद्यालय ऊरुळी कांचन या विद्यालयाचे प्राचार्य श्री भरत भोसले कवी संगीतकार श्री सतीश कांबळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने झाली. स्वागत गीताचे सादरीकरण साने संगीत क्लासेसचे विद्यार्थ्यांनी केले. गीता बरोबरच अभंग, गवळण, छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा, मराठी व हिंदी गाणी उत्कृष्ट सादर केली. संस्कृती अंधारे, सोनाली सुकाळ, संकेत खंडागळे, आदित्य लोखंडे, वैष्णवी साळूंखे, आरोही साळूंखे, श्रीशा काकडे, काळूराम जाधव, सुयश घनवट, हर्षद बोबडे, या विद्यार्थ्यांनी गायन वादन संगीत कलेचे उत्कृष्ट सादरीकरण केले म्हणून त्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. उपस्थित कवींनी स्वरचित रचलेल्या कविता सादर केल्या. कवी संमेलनाचे औचित्य साधून संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल श्री शिवराज साने सर यांना संगीत रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. श्री शिवराज साने यांनी व्यसन मुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी कार्यक्रम, आरोग्य, हुंडाबंदी असे समाज प्रबोधन करणे लोकगीते,भारूडे, महापुरुषांच्या कार्याचा गीतातून गुणगौरव करून समाज प्रबोधन करण्याचे काम अविरतपणे केले.त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना उत्कृष्ट संगीतकार पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. कार्यक्रमाचे आयोजन अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद पुणे जिल्हाध्यक्ष व पोलिस मित्र संघ महाराष्ट्र राज्याचे विभागीय अध्यक्ष श्री सुरेश वाळेकर यांनी केले तर सुत्रसंचालन अँड उमाकांत अदमाने यांनी केले.

## मजबूत कुटुंब हेच सुंदर समाज आणि उज्वल भविष्याची खरी ताकद - शिवराज भुमरे

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत / प्रदीप पोटफोडे :** प्रेम, विश्वास, आधार, संस्कार आणि आयुष्यभर साथ जिथे मिळते ते कुटुंब असते. जग कितीही बदललं तरी माणसाला खऱ्या अर्थाने आनंद सुरक्षितता आणि आपलेपणा कुटुंबातूनच मिळतो. म्हणून मजबूत कुटुंब हेच सुंदर समाज आणि उज्वल भविष्याची खरी ताकात असते असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर जि. प. चे सदस्य श्री.शिवराज भुमरे यांनी केले. येथील शिवछत्रपती महाविद्यालयामध्ये जागतिक कुटुंब दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे हे होते. कार्यक्रमासाठी श्री ज्ञानेश्वर विद्यालयाचे




सहशिक्षक राहुल नरवडे आणि प्रसाद हरेर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांचे शाल आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित स्वागत करण्यात आले. पुढे बोलताना शिवराज भुमरे म्हणाले की, आईची निरपेक्ष माया, वडिलांचा भक्कम आधार, भावंडांची मजबूत साथ आणि आपल्या माणसांचे प्रेम हे कुटुंबातूनच मिळत असते. म्हणून आंतरराष्ट्रीय कुटुंब दिनाच्या निमित्ताने आपल्या माणसांना प्रेम आणि वेळ देऊन नाती जपण्याचे आवाहनही त्यांनी केले.

कुटुंब म्हणजे एका घरात राहणारी फक्त माणसं नसतात तर सुखदुःखात एकमेकासाठी उभे राहणारे नाते असते. जगात कितीही पैसा, प्रसिद्धी किंवा यश मिळालं तरी दिवसाच्या शेवटी माणसाला कुटुंबातच सुख, शांती आणि समाधान मिळत असते असे मत प्राचार्य डॉ चंद्रसेन कोठावळे यांनी व्यक्त केले. ते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैभव राऊत यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार श्रीकांत चिंचखेडे यांनी मानले.

यावेळी मुरलीधर झिणे, मनोज राक्षे आदी उपस्थित होते.

## संपादकीय

### बाबूशाहीच्या बेबंदक्रीडा!

जेथे खेळाडूंना किंमत नाही, त्यांच्या सुविधांविषयी संवेदनशीलता नाही, असा देश ऑलिम्पिकविजेते कसे घडवणार, असा प्रश्न येथील प्रस्थापितांना कधीही पडत नाही.

दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीच्या शहरात रुबाबात राहायचे, तर पद हवे आणि पैसाही. आता दिल्ली कोण महागडी, तेव्हा मौज आणि माज दोन्ही करायचा तर धनाची तजवीज हवी. आपले ते आपलेच, दुसऱ्याचेही ते आपलेच असे मानणाऱ्यांची या महानगरीत वानवा नाही. या सद्गुणात राजकारणी फिके पडतील, असे कौशल्य सरकारी बाबूंनी मिळवले आहे. सरकारी बाबूंसाठी मोठमोठाली संकुले बनतील, तर बनू द्यावीत. पण या संकुलांसाठी लागणाऱ्या उंची सोयीसुविधांसाठी लागणारा निधीच पुरत नाही त्याचे काय करायचे? तो कुठून तरी आणावा लागेलच ना? दिल्लीस्थित बाबूंनी याच संदर्भात निधी उत्खननासाठी कशी नामी शक्कल लढवली, हे 'दि इंडियन एक्स्प्रेस'ने १४ मे रोजी प्रसिद्ध केलेल्या सविस्तर वृत्तांतातून धक्कादायकरीत्या स्पष्ट होते. एका अत्यंत महत्त्वाच्या क्रीडा योजनेसाठी निर्धारित केलेल्या निधीमधील रक्कम पद्धतशीरपणे विलासी सुविधांच्या उभारणीसाठी कशी वळती केली जात होती, याचे सोदाहरण वृत्तांकन 'इंडियन एक्स्प्रेस'चे क्रीडा प्रतिनिधी मिहीर वासवदा यांनी सादर केले. क्रीडा निधी केवळ बिगरक्रीडा आस्थापनांनाच पुरवला गेला असे नव्हे, विद्यमान सरकारला प्रात:स्मरणीय अशा मातृसंघटनेसाठीही वापरण्यात आल्याचे उघड झाले. ऑलिम्पिक, राष्ट्रकुल, आशियाई स्पर्धा, जागतिक स्पर्धांमध्ये भारतात पदकविजेते निर्माण व्हावेत, त्यासाठी त्यांना अद्ययावत प्रशिक्षण व सराव सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी जो निधी मुक्रर करण्यात आला आहे, त्याच निधीवर डल्ला मारण्यात आल्याचे उघडकीस आले. यांतील काही निधी उच्च आणि अत्युच्च सरकारी अधिकाऱ्यांच्या निवासी वसाहतींमध्ये क्रीडा संकुलांच्या उभारणीसाठी वापरला गेला. काही निधी अधिकाऱ्यांच्या उंची क्लबांमध्ये निर्गमित झाला. हे सर्व अधिकारी केंद्र सरकारमध्ये वरिष्ठ आणि अतिवरिष्ठ पदांवर असतील हे उघड आहे. कदाचित म्हणूनच त्यांना इतक्या सहजपणे असा निधी वैयक्तिक विलासी उद्दिष्टांसाठी वळवता आला असावा, हे समजण्यास तज्ज्ञांची वा तपास यंत्रणांची गरज नाही. 'इंडियन एक्स्प्रेस'ने माहितीच्या अधिकारातून हा प्रकार उघडकीस आणला नसता, तर कदाचित उरल्यासुरल्या निधीचा विनियोगही याच प्रकारे झाला असता.

या प्रकरणातील तपशील धक्कादायक आहेत. 'नॅशनल स्पोर्ट्स डेव्हलपमेंट फंड' (एनएसडीएफ) या नावे एका निधीची स्थापना १९९८ मध्ये झाली. त्याच्या दोनच वर्षे आधी म्हणजे १९९६ मध्ये अटलांटा येथे झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत भारताच्या लिअँडर पेसने कांस्यपदक जिंकले. कुस्तीगीर खाशाबा जाधव यांनी १९५२ मध्ये हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये जिंकलेल्या कांस्यपदकानंतर तब्बल ४४ वर्षांनी भारताला वैयक्तिक प्रकारात ऑलिम्पिक पदक जिंकता आले होते. खाशाबा किंवा लिअँडर यांच्या त्या कामगिरीत भारत सरकारचा वाटा नगण्य म्हणावा असाच. पण ही परिस्थिती सुधारण्याचा विचार झाला आणि देशांतर्गत प्रशिक्षण, सरावासाठी अधिक अद्ययावत सुविधांची उभारणी व्हावी, खेळाडूंना निधीची कमतरता भासू नये यासाठी सरकारी-खासगी भागीदारीतून 'एनएसडीएफ'ची निर्मिती झाली.

ऑलिम्पिक पदकविजेते निर्माण व्हावेत या उद्देशाने सुरू झालेल्या 'टॉप्स' (टार्गेट ऑलिम्पिक पोडियम स्कीम) उपक्रमासाठी याच निधीतून पैसा पुरवला जातो. पण गेल्या २०२१ ते २०२५ या काळात सिव्हिल स्व्हिहसेस ऑफिसर्स इन्स्टिटट्यूट, सेंट्रल सिव्हिल स्व्हिहसेस कल्चरल अँड स्पोर्ट्स बोर्ड, न्यू मोती बाग रेसिडेन्शियल कॉम्प्लेक्स या संस्थांना ६.२ कोटी निधी वितरित झाला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित राजस्थान आणि छत्तीसगड येथील संस्थांकडे क्रीडा स्पर्धा व सुविधा उभारणीसाठी २.६६ कोटी रुपये दिले गेले.

# भिमटेकटी संभाजीनगर (औरंगाबाद) येथे बुध्दिस्ट फेस्टिवल 17 मे 2026 ला भिमजयंती

## बुध्दजयंतीच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यानमाला व बुध्दभिमगितांचा भहारदार कार्यक्रम

महाराष्ट्र जीत

**औरंगाबाद,(प्रतिनिधी)-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या संभाजीनगर (औरंगाबाद) येथील पु.प्रा. भिक्खुणी धम्मदर्शना महाथेरो यांनी स्थापन केलेल्या भारतीय विनय अलंकार धम्मज्ञान प्रशिक्षण केंद्र जडवाडा भिमटेकडी यांनी आयोजित केलेल्या बुध्दिस्ट फेस्टिवल 2026 भिमजयंती व बुध्दजयंती संयुक्त विद्यमाने 17 मे 2026 रोज रविवारला संयकाळी पाच (5.00) ते रात्री दहा (10.00) पर्यंत व्याख्यानमाला व बुध्दभिमगीतांचा कार्यक्रम विश्वशांती बुध्दविहार जटवाडा रोड, सुभाषनगर, लेणीपरिसर, भिमटेकडी, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे पु.भदन्त खेमोधम्मोजी महास्थवीर यांच्या




अध्यक्षतेखाली आयोजित केला असून या कार्यक्रमाचे उद्घाटक आयएएस अधिकारी मुंबई उत्तमरावजी खोब्रागडे तर विशेष अतिथी जेष्ठ लेखक व साहित्यिक ऋषिकेशजी कांबळे राहणार आहे

विशेष उपस्थिती श्रद्धा हाऊस्पिटल औरंगाबादचे डॉ.मानवजी पगारे, जेष्ठ समाजसेवीका अनिताताई हिवाळे, एलआयसी अधिकारी एस.आर.बोधडे, ज्येष्ठ पत्रकार बुलडाणा बाबासाहेब जाधव राहणार आहेत.

सर्व आंबेडकर जनतेला व प्रबुध्द जनतेला अत्यंत आनंद होत आहे की, भारतीय विनय अलंकार धम्मज्ञान प्रशिक्षण केंद्र या संस्थेच्या वतीने भिमजयंती ते बुध्दजयंती श्रामनेर, श्रामणेरी बेसिक प्रशिक्षण शिबीर प.पु. प्रा.महाथेरो धम्मदर्शना यांच्या मार्गदर्शना खाली आयोजित करण्यात आले होते.

हे प्रशिक्षण घेण्याचा उद्देश म्हणजे प.पु.भारतरत्न विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले की," मी बौद्ध झालो, माझा मुलगा बौध्द होऊ शकत नाही. त्यासाठी त्याला धम्माची 10 दिवसाची श्रामणेर दीक्षा घ्यावी लागेल."

त्या अनुषंगाने भिमटेकडी येथे एक महीण्याचे 17 एप्रिल ते 17 मे शिबीर आयोजित केले होते.

त्या श्रामणेर, श्रामणेरी बेसिक प्रशिक्षण शिबिराची सांगता व भिमजयंती कशा पद्धतीने साजरी करावयाची व बुध्द जयंती कशा पद्धतीने साजरी करायची याचा समाजावर होणारा परिणाम याबाबत 17 मे याच दिवशी व्याख्यान व भिमबुध्द गीताचाही कार्यक्रम आयोजीत केला आहे.

तरी सर्व उपासक/ उपासिका व बुध्द भिम प्रेमी यांनी या कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून धम्मज्ञानाचा लाभ घ्यावा व धम्माचे काम करण्यासाठी आर्थिक मदतीची गरज असते त्यासाठी तनमन धनाने माताजींच्या फोन पे 9822633484,8208134850 किंवा बॅंकऑफ महाराष्ट्र, औरंगाबाद एसी 60233326522 आ य ए फ ए स सी एमएचबी0000152 यावर धम्मदान देऊन पुण्याचं कुशल कम्म संपादन करावे ही मंगल कामना करून धम्मदान करावे. असे आवाहन भिक्खुणी प्रा. धम्मदर्शना महाथेरो भिमटेकडी जटवाडा (औरंगाबाद) छत्रपती संभाजीनगर यांनी भिम उपासक-उपासिका धम्मदात्यांना केले.

तसेच येणाऱ्या सर्व उपासक- उपासीकांसाठी भोजनाची व्यवस्था केली आहे.

## शिक्षक भरतीसंदर्भात कारंजा शहर कॉंग्रेसचे नगर परिषदेत निवेदन

### बिंदुनामावली पूर्ण करून पवित्र पोर्टलवर जाहिरात प्रसिद्ध करण्याची मागणी

महाराष्ट्र जीत

**कारंजा: शहर प्रतिनिधी :** कारंजा शहर कॉंग्रेस कमिटीच्या वतीने आज नगर परिषद मुख्याधिकारी कार्यालयात शिक्षक भरती संदर्भात महत्त्वाचे निवेदन सादर करण्यात आले.

कारंजा नगर परिषद अंतर्गत अनेक शिक्षकांची पदे रिक्त असून स्थानिक शिक्षण विभागाच्या दिरंगाईमुळे बिंदुनामावलीचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यामुळे पात्र उमेदवारांना भरती प्रक्रियेपासून वंचित राहावे लागत असल्याची खंत निवेदनातून व्यक्त करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे व मा. शिक्षण आयुक्त, पुणे यांच्या आदेशानुसार शिक्षक भरतीसाठी पवित्र पोर्टल दिनांक ०१ मे २०२६ पासून सुरू करण्यात आले असून त्याची अंतिम मुदत ३१ मे २०२६ आहे. या कालावधीत रिक्त पदांची जाहिरात पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक असताना बिंदुनामावली अपूर्ण असल्याने ही प्रक्रिया रखडलेली असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले.

यावेळी बिंदुनामावली तात्काळ पूर्ण करणे, सर्व रिक्त पदे पवित्र पोर्टलवर समाविष्ट करणे तसेच कला, क्रीडा व कार्यानुभव विषयांच्या पदांचा समावेश करण्याची मागणी करण्यात आली.

हे निवेदन माजी नगर परिषद अध्यक्ष







अरविंदजी लाठिया यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले.

यावेळी कारंजा शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष अब्दुल राजीक शेख,सेवादल कॉंग्रेस तालुका अध्यक्ष विजय कडू, सेवादल कॉंग्रेस शहर अध्यक्ष प्रदीप वानखाडे तसेच नईम भाई, निझमोदीन भाई, असलम भाई, अक्षय बंसोड, अल्ताफ गर्व, लखन घारू, अनवार अहमद आदी उपस्थित होते.

प्रशासनाने या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर योग्य निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

## मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदन रस्ते समितीच्या अशासकीय सदस्यपदी दिवाकर पाटील ठाकरे यांची नियुक्ती

### खरेदी विक्री संस्थेचे अध्यक्ष देवेन्द्र ताथोड यांनी केला त्यांचा सत्कार

महाराष्ट्र जीत

**नकूल उपाध्ये / कारंजा लाड प्रतिनिधी :** कारंजा मानोरा विधान सभा क्षेत्रीय मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदन रस्ते समितीच्या अशासकीय सदस्य पदी आ सईताई प्रकाश डहाके यांचे सूचनेनुसार दिवाकर चंपतराव ठाकरे रा . बेलखेड कामठा यांची उपविभागीय अधिकारी कारंजा यांनी दि १२.५ .२६ चे पत्राद्वारे नियुक्ती केली आहे . सदर नियुक्ती शासन निर्णयाचे अनुशंगाने मा जिल्हाधिकारी वाशिम यांचे संदर्भ क्रं .२ चे आदेशा नुसार कारंजा विधान सभा मतदार संघाकरीता मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदन रस्ते योजना राबविण्याकरीता समीती स्थापन करण्यात आली आहे . या क्षेत्रीय समीती मध्ये दिवाकर पाटील ठाकरे बेलखेड यांच्या सह एकून पांच सदस्य नियुक्त आहेत . दिवाकर पाटील ठाकरे हे कारंजा तालुक्यातील बेलखेड कामठा येथील प्रगतीशील शेतकरी असून डहाके परिवाराचे विस्वासू म्हणून त्यांची ओळख आहे . आमदार सईताई डहाके यांच्या शिफारशीने त्याची शासन स्तरावरून सदर समिती साठी निवड झाली आहे .त्यांच्या निवडीचा शेतकऱ्यांना पांदन



रस्ते संदर्भात निश्चीतच फायदा होईल असा आशावाद व्यक्त होत आहे .त्यांच्या निवडीचे कारंजा तालुक्यात स्वागत होत असून कारंजा तालुका खरेदी विक्री संघ कार्यालयात अध्यक्ष देवेन्द्र ताथोड यांनी त्यांचा संस्थे तर्फे नुकताच पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला . यावेळी देवेन्द्र ताथोड़ यांनी त्याच्या कार्यास शुभ चिंतले आहे . दिवाकर पाटील ठाकरे हे हजरजबाबी व्यक्तिमत्व म्हणून ओळल्या जाते त्यांचा कारंजा तालुक्यात चाहता वर्ग असून त्यांच्या चाहत्यांनी त्यांचे नियुक्तीचे स्वागत करुन आनंद व्यक्त करीत अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

## विनोद झळके यांची पोलीस निरिक्षक म्हणून पदोन्नती, सत्कार समारंभ संपन्न



महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर) :** विनोद मुंगसाजी झळके यांची पोलीस निरीक्षक म्हणून नक्कीच पदोन्नती झालेली आहे. याच पार्श्वभूमीवर

सद्या ते कार्यरत पो.स्टे.गोरेगाव जि. हिंगोली येथे API असताना नुकत्याच राज्य सरकारने पदोन्नती दिलेल्या यादीमध्ये पोलीस निरीक्षक म्हणून साहेबांना पदोन्नती आहे.झळके साहेबानी 2002 साली पोलीस हवालदार या पदापासून सुरवात केली.पण कठोर परिश्रम व अभ्यासात सातत्य त्यामुळे पोलीस प्रशासनाकडून घेण्यात आलेल्या mpsc परिक्षेतून PSI बनले . भोकर, पांढरकवडा ,यवतमाळ या नंतर API म्हणून वाशिम व हिंगोली जिल्ह्यात कर्तव्य बजावले. आणि आता PI म्हणून मुंबई येथे बदली झाली आहे.विनोदराव मुंगसाजी झळके साहेब (PI) पोलीस निरीक्षक पदी पदोन्नतीने नियुक्ती झाल्याबद्दल आदिवासी कर्मचारी संघटना वाशिम यांच्या वतीने त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.यावेळी भारताचे संविधान भेट देऊन तसेच साहेबांसह त्यांच्या मातोश्री व सौभाग्यवतींचा गौरव करण्यात आला. कर्तव्यनिष्ठा,प्रामाणिकपणा आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी यांच्या जोरावर मिळवलेले हे यश अनेक आदिवासी बांधव व भगिनी साठी प्रेरणादायी व आदर्शवत आहे.

## संभाव्य एल-निनो संकटाच्या पार्श्वभूमीवर यंत्रणांनी काटेकोर नियोजन करावे - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रविणपट्टेबहादुर) :** 'एल निनो'चा परिणाम यंदाच्या मान्सूनवर होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात संभाव्य पाणीटंचाई परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी सर्व विभागांनी सतर्क राहून उपलब्ध जलसाठ्याचा काटेकोर आणि नियोजनबद्ध वापर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात संभाव्य एल निनो परिणाम आणि प्रतिबंधक आणि उपाययोजना याबाबत आयोजित आढावा बैठकीत श्री कुंभेजकर बोलत होते.यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान,निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाहा, जिल्हा जलसंधारण अधिकारी श्याम फेरवाणी, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग तसेच पाटबंधारे विभागाचे अधिकारी उपस्थित




होते.पाणी साठवणूक क्षमतेवर भर श्री कुंभेजकर यांनी संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन प्रत्येक विभागाने स्वतंत्र नियोजन तयार ठेवावे तसेच स्थानिक परिस्थितीनुसार तातडीने उपाययोजना राबविण्यासाठी सज्ज राहावे, असे त्यांनी सांगितले.जिल्ह्यातील जलस्रोतांची तातडीने पाहणी करून आवश्यक कामे प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.तसेच जलस्रोतांमधील गाळ काढून पाणी साठवणुकीची क्षमता वाढविण्यावर भर देण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.पाणी अपव्यय रोखण्याच्या सूचना सध्याचा पाणीपुरवठा सुरळीत राहण्यासाठी पाणी गळती व अपव्यय टाळण्याबाबत विशेष दक्षता घेण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. उपलब्ध पाण्याचा वापर अत्यंत जबाबदारीने व नियोजनपूर्वक करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद यावेळी केले.

पिण्याच्या पाण्याचे स्रोत आटू नयेत यासाठी आवश्यकतेनुसार संबंधित जलस्रोतांतून अवैध उपसा होऊ नये यासाठी सजग राहावे. संबंधित अधिकाऱ्यांनी आवश्यकतेनुसार योग्य ती कार्यवाही करावी, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.शेतकरी आणि पशुधनासाठीही नियोजन

एल निनोच्या संभाव्य परिणामांच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने शेतकऱ्यांना हवामानाच्या अंदाजानुसार पेरणीबाबत योग्य मार्गदर्शन करावे. कमी पाण्यात येणारी पिके, पावसाच्या स्थितीनुसार पेरणीचे नियोजन तसेच हवामान आधारित शेती व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यावर भर देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.याशिवाय संभाव्य दुष्काळजन्य परिस्थिती लक्षात घेऊन जनावरांसाठी चारा उपलब्ध राहील याबाबत आगाऊ नियोजन करण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या.

एल निनोच्या संभाव्य प्रभावाच्या पार्श्वभूमीवर सर्व विभागांनी परस्पर समन्वय ठेवून सज्ज राहावे तसेच नागरिकांनीही पाणी बचतीबाबत जागरूक राहून उपलब्ध पाण्याचा जपून वापर करावा,असे आवाहन त्यांनी केले.बैठकीला सर्व संबंधीत अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# कृषी विज्ञान केंद्राद्वारे शेतकऱ्यांना आवाहन

## "संतुलित खतांचा वापर अभियान" : शाश्वत शेती, सुपीक माती आणि समृद्ध शेतकरी यासाठी वैज्ञानिक वाटचाल

महाराष्ट्र जीत

**वाशीम(प्रतिनिधी) :** भारतीय शेती ही देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानली जाते. वाढती लोकसंख्या, बदलते हवामान, जमिनीची घटती सुपीकता आणि उत्पादन खर्चातील सातत्याने होणारी वाढ या पार्श्वभूमीवर अधिक उत्पादन घेण्याच्या प्रयत्नात रासायनिक खतांचा असंतुलित वापर मोठ्या प्रमाणात वाढलेला दिसून येतो. विशेषतः नत्रयुक्त खतांचा (युरिया) अति वापर, स्फुरद व पालाशाचा अपुरा वापर तसेच सूक्ष्म अन्नद्रव्यांकडे दुर्लक्ष यामुळे जमिनीच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. परिणामी मातीतील सेंद्रिय कर्ब कमी होत असून उत्पादनक्षमता घटण्याची समस्या गंभीर बनत आहे.



या पार्श्वभूमीवर भारत सरकार, भारतीय कृषी अनुसंधान परिषद (ICAR), कृषी विभाग आणि कृषी विज्ञान केंद्रांच्या माध्यमातून "संतुलित खतांचा वापर अभियान" प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांमध्ये माती परीक्षणावर आधारित खत व्यवस्थापनाबाबत जनजागृती निर्माण करणे, जमिनीची सुपीकता टिकवून ठेवणे आणि शाश्वत शेतीला चालना देणे हा आहे.

संतुलित खत व्यवस्थापन म्हणजे पिकांच्या गरजेनुसार योग्य प्रमाणात, योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने रासायनिक, सेंद्रिय व जैविक खतांचा समन्वित वापर होय. केवळ रासायनिक खतांवर अवलंबून न राहता शेणखत, गांडूळखत, हिरवळीची खते, जैविक खते आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांचा समावेश करून जमिनीचे आरोग्य सुधारण्याचा प्रयत्न या अभियानातून केला जात आहे.

आज अनेक भागांमध्ये माती परीक्षणाशिवाय अंदाजाने खतांचा वापर केला जातो. त्यामुळे काही अन्नद्रव्यांचा अतिरेक तर काहींची कमतरता निर्माण होते. यामुळे उत्पादन खर्च वाढतो, पिकांची गुणवत्ता कमी होते तसेच जमिनीची दीर्घकालीन उत्पादकता घटते. माती परीक्षणाच्या आधारे खतांचा वापर केल्यास जमिनीतील उपलब्ध अन्नद्रव्यांची अचूक माहिती मिळते आणि त्यानुसार पिकांना आवश्यक खत व्यवस्थापन करता येते. यामुळे खतांचा अपव्यय कमी होऊन उत्पादनात वाढ होते.

असंतुलित खत वापरामुळे जमिनीतील सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता वाढत असून झिंक, गंधक, बोरॉन आणि लोह यांसारख्या अन्नद्रव्यांच्या अभावामुळे पिकांमध्ये विविध लक्षणे दिसून येतात. तसेच जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीवांची संख्या घटून मातीचा पोत खराब होतो. अतिरिक्त रासायनिक खतांचा वापर पर्यावरण आणि भूजल प्रदूषणास कारणीभूत ठरत आहे. त्यामुळे संतुलित खत व्यवस्थापन ही आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाची गरज बनली आहे.

संतुलित खत वापरामुळे पिकांना आवश्यक पोषण योग्य प्रमाणात मिळाल्याने उत्पादनात व गुणवत्तेत वाढ होते. पिकांची रोगप्रतिकारक क्षमता सुधारते, जमिनीची सुपीकता टिकून राहते आणि उत्पादन खर्चात बचत होते. याशिवाय सेंद्रिय कर्ब वाढल्याने जमिनीची पाणी धारण क्षमता सुधारते व हवामान बदलाच्या परिस्थितीतही पिकांची सहनशीलता वाढण्यास मदत होते.

या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीमध्ये शेतकऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येक शेतकऱ्याने नियमित माती परीक्षण करून माती आरोग्य पत्रिकेनुसार खतांचा वापर करणे आवश्यक आहे. तसेच रासायनिक खतांचा संतुलित वापर करताना सेंद्रिय व जैविक खतांचा समावेश करावा. हिरवळीच्या खतांचा वापर, पिक फेरपालट, पिक अवशेष व्यवस्थापन आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांचा शास्त्रशुद्ध वापर याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

कृषी विज्ञान केंद्र वाशिम (करडा), ता. रिसोड, जि. वाशिम यांच्या वतीने सर्व शेतकरी बांधवांना आवाहन करण्यात येते की, "माती परीक्षणावर आधारित संतुलित खत व्यवस्थापन" या वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून जमिनीचे आरोग्य जतन करावे. अंदाजाने खतांचा वापर टाळून शिफारशीनुसार योग्य मात्रा, योग्य वेळ आणि योग्य पद्धतीने खतांचा वापर करावा. विशेषतः युरियाचा अतिरेक टाळून नत्र, स्फुरद, पालाश तसेच झिंक, गंधक आणि इतर सूक्ष्म अन्नद्रव्यांचा संतुलित वापर करणे अत्यंत आवश्यक आहे.

कृषी विज्ञान केंद्रामार्फत आयोजित प्रशिक्षण कार्यक्रम, प्रात्यक्षिके, शेतकरी मेळावे, माती परीक्षण मोहीम आणि जनजागृती उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन आधुनिक व शास्त्राधारित शेती तंत्रज्ञानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर.एल. काळे यांचे द्वारे करण्यात येत आहे.

आजची गरज आहे —

"माती वाचवा – सुपीकता वाढवा – संतुलित खतांचा वापर करा – शाश्वत शेतीकडे वाटचाल करा."

संतुलित खत व्यवस्थापनाचा अवलंब केल्यास शेती अधिक उत्पादक, पर्यावरणपूरक आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर बनेल. शेतकरी, कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्रे आणि संशोधन संस्था यांच्या संयुक्त प्रयत्नातून हे अभियान निश्चितच यशस्वी होईल आणि भारतीय शेती अधिक सक्षम व शाश्वत बनेल.

## पुणे विभाग शिक्षक मतदारसंघासाठी प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या नावाची जोरदार चर्चा; विविध संघटनांचा पाठिंबा

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी शाम जगताप** : "संघटना हे समाजजीवनाचे महत्त्वाचे अंग आहे. शिक्षण क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यासाठी संघटित प्रयत्न आवश्यक आहेत. विद्यार्थी, शिक्षक आणि शैक्षणिक घटकांचे हित जपण्यासाठी सक्षम नेतृत्वाची गरज असून पुणे विभागातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्राचार्य नंदकुमार सागर यांचे नेतृत्व प्रभावी ठरू शकते," असे प्रतिपादन मुंबई सेकंडरी सोसायटीचे संचालक तुकाराम बेनके यांनी केले.

भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार रवींद्र चव्हाण यांच्या वतीने प्रमुख मार्गदर्शक संतोष साखरे यांना मुख्याध्यापक-शिक्षक संघटनांच्या प्रतिनिधींनी पुणे येथील भाजपा कार्यालयात विविध शैक्षणिक मागण्यांचे निवेदन सादर केले. या निवेदनाचा स्वीकार संतोष साखरे यांनी केला.




यावेळी पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रसाद गायकवाड, कार्याध्यक्ष राजेश गायकवाड, महाराष्ट्र राज्य आश्रमशाळा महासंघाचे उपाध्यक्ष तुकाराम शिरसाट, शिरूर तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष रामदास थिटे, सचिव बाळासाहेब चव्हाण, संदीप जगताप, राष्ट्रपती पारितोषिक विजेते प्राचार्य कुंडलीक मेमाणे, राणी बांदल-मानकर, दत्तात्रय रोकडे, उत्तम पोटावडे, महाराष्ट्र शिक्षक परिषदेचे निलेश काशीद, महेश शेलार, संजीव मांढरे, शिवहार लहाणे, अरविंद गवळे, प्रशमन कोल्हे, बबनराव उकीरडे, सुनिल मोरे, पुणे शहर मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष शिवाजी शिंदे, रोहीदास भारमळ, सतीश वाघमारे, विष्णू मोरे, विष्णूदास गावडे यांच्यासह विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी महाराष्ट्र state मुख्याध्यापक महासंघाचे सचिव नंदकुमार सागर यांनी शैक्षणिक क्षेत्रातील विविध प्रलंबित प्रश्न मांडले. "जुनी पेन्शन योजना त्वरित लागू करावी, अनुदान पात्र शाळांना विनाअट अनुदानाचा टप्पा मिळावा, संच मान्यतेच्या निकषांमध्ये सुधारणा व्हावी, वेतनेतर अनुदान किमान १२ टक्के द्यावे, ग्रामीण भागातील अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया रद्द करावी, पवित्र पोर्टलद्वारे १०० टक्के शिक्षक भरती वर्षातून दोनदा व्हावी तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती तातडीने करावी," अशी मागणी त्यांनी केली.

शैक्षणिक प्रश्नांवरील सखोल अभ्यास, संघटनात्मक नेतृत्व आणि शिक्षकांच्या प्रश्नांवर सातत्याने घेतलेली भूमिका यामुळे नंदकुमार सागर यांचे नेतृत्व अभ्यासू, सुसंस्कृत आणि सजग असल्याचे मत विविध पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले. पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून त्यांना संधी देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

दरम्यान, पुणे विभाग शिक्षक मतदारसंघासाठी भारतीय जनता पक्षाकडून नंदकुमार सागर यांच्या उमेदवारीची जोरदार चर्चा सुरू असून इच्छुक उमेदवारांमध्ये त्यांचे नाव आघाडीवर असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. शिक्षण क्षेत्रातील दीर्घ अनुभव आणि संघटनात्मक कार्यामुळे त्यांची उमेदवारी प्रभावी मानली जात आहे.

## पार्डी आसरा येथील 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरां'ना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### जिल्हाभरात २ हजार ५९४ प्रकरणांचा निपटारा; नागरिकांना मिळाला मोठा दिलासा

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर) :** शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना व सेवा थेट सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने जिल्हाभर आयोजित करण्यात आलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरां'ना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, या शिबिरांमधून प्रशासनाने नागरिकांच्या समस्यांवर तातडीने कार्यवाही करत तब्बल २ हजार ५९४ प्रकरणांचा निपटारा केला आहे.जिल्हा प्रशासनाच्या समन्वयातून राबविण्यात आलेल्या या विशेष शिबिरांमध्ये महसूल, ग्रामविकास, सामाजिक न्याय, कृषी, आरोग्य, महिला व बाल विकास आदी विभागांनी सहभाग घेत नागरिकांच्या विविध मागण्या, अर्ज व तक्रारींचे तत्काळ निराकरण केले. अनेक लाभार्थ्यांना आवश्यक दाखले, प्रमाणपत्रे तसेच विविध योजनांची माहिती व लाभ जागेवरच उपलब्ध करून देण्यात आला.प्राप्त माहितीनुसार, वाशिम तालुक्यात सर्वाधिक ७३९, मंगरुळपीरमध्ये ६३५, कारंजामध्ये ४६५, रिसोडमध्ये ३२५, मालेगावमध्ये २८६ तर मानोरामध्ये १४४ प्रकरणांवर कार्यवाही करण्यात आली. शिबिरांमध्ये उपस्थित अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या अडचणी समजून घेत तत्परतेने निर्णय घेतल्याने अनेक प्रकरणांचा जागेवरच निपटारा झाला. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय कार्यालयांच्या वारंवार फेऱ्यांपासून मोठा दिलासा मिळाला असून "प्रशासन आता खरंच जनतेच्या दारी पोहोचत आहे," अशी भावना लाभार्थ्यांनी व्यक्त केली. विशेष म्हणजे, विविध योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. शासनाच्या योजना प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी आणि नागरिकांच्या तक्रारींचे जलद निराकरण करण्यासाठी अशा समाधान शिबिरांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरत असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले. या समाधान शिबिराला उपविभागीय अधिकारी, तहसीलदार नायब तहसीलदार मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामपंचायत अधिकारी तसेच विविध विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.





## ३०० कोटी वृक्षारोपण अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व्यापक नियोजन करावे - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर) :** ३०० कोटी वृक्षारोपण अभियान हे केवळ वृक्ष लागवडीपुरते मर्यादित नसून भविष्यातील पर्यावरण संरक्षण, जलसंधारण आणि हवामान बदलाच्या परिणामांना तोंड देण्यासाठीची व्यापक लोकचळवळ आहे. प्रत्येक विभागाने समन्वयाने काम करून वृक्षारोपणासोबतच त्यांचे दीर्घकालीन जतन व संवर्धन यावर भर द्यावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या ३०० कोटी वृक्षारोपण अभियान २०२६-२०४७ अंतर्गत जिल्हास्तरीय नियोजन, समन्वय व अंमलबजावणीसंदर्भात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, उपवनसंरक्षक अभिजित वायकोस आदींची प्रमुख उपस्थिती होती.बैठकीत अभियानाची उद्दिष्टे, लँड बँक निर्मिती, स्थानिक प्रजातींची निवड, आर्थिक नियोजन, डिजिटल मॉनिटरिंग प्रणाली आणि वृक्ष संवर्धनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शासन निर्णय दि. ७ मे २०२६ अन्वये राज्यात हरित महाराष्ट्र उभारण्याच्या उद्देशाने सन २०२६ ते २०४७ या कालावधीत व्यापक वृक्षारोपण मोहीम राबविण्यात येणार आहे.जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर यांनी सांगितले की, वृक्षारोपण क्षेत्रांचे शंभर टक्के जिओ-टॅगिंग, उपग्रहाधारित पडताळणी आणि डिजिटल एमआरव्ही (Monitoring, Reporting and Verification) प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. पाचव्या वर्षापर्यंत किमान ६० टक्क्यांपेक्षा अधिक जिवंत रोपांचे प्रमाण राखण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, पुढील दहा वर्षांपर्यंत वृक्षांचे जतन आणि संवर्धन करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.यावेळी हरित महाराष्ट्र आयोग अंतर्गत जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीच्या कार्यपद्धतीवरही चर्चा झाली. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन होणाऱ्या समितीत जिल्हा परिषद, वन विभाग, महसूल, कृषी, आदिवासी विकास, नगर परिषद व अन्य विभागांचे अधिकारी सहभागी राहणार आहेत. जिल्ह्यातील उपलब्ध शासकीय पोटखराब जमिनींपैकी ५ हजार ६१४.९० हेक्टर क्षेत्र अभियानासाठी लक्ष्य म्हणून निश्चित करण्यात आले आहे. तसेच यवतमाळ व वाशिम जिल्ह्यासाठी वन विभागाकडून २ हजार ६८५.२९ हेक्टरचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.



बैठकीत अभियानाच्या विविध टप्प्यांची माहिती देण्यात आली. ३० जून २०२६ पर्यंत जीआयएस आधारित लँड बँक निश्चिती, प्रजाती निवड, रोपवाटिका नियोजन, आर्थिक तरतूद व जबाबदारी वाटप पूर्ण करण्यात येणार आहे. ५ जून २०२६ रोजी जागतिक पर्यावरण दिनी आयोगाची औपचारिक स्थापना करण्यात येणार असून त्यानंतर सन २०२६ ते २०४७ या कालावधीत टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी होणार आहे.नागरी भागात 'अटल आनंदवन घनवन' संकल्पनेद्वारे हरित क्षेत्र वाढविण्यावर भर देण्यात येणार असून सीएसआर, जिल्हा नियोजन समिती निधी, राज्य व केंद्र योजना, कार्बन क्रेडिट आणि ग्रीन क्रेडिटसारख्या विविध माध्यमांतून निधी उपलब्ध करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली.माहितीचे सादरीकरण सामाजिक वनीकरणचे विभागीय वनाधिकारी अशोक पराड यांनी केले. यावेळी संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## सेवा -साधना कृतज्ञता सोहळा












महाराष्ट्र जीत

**पुणे(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) :** 'द करेज टू बी ह्यूमन' या अत्यंत प्रेरणादायी कार्यक्रमात सूत्रसंचालन करण्याची संधी मिळाली, हा अनुभव माझ्यासाठी खरोखरच समृद्ध करणारा ठरला.

महाराष्ट्र राज्याचे शिक्षण आयुक्त मा. श्री सचिंद्रप्रताप सिंह यांच्या हस्ते सन्मानित होण्याचा बहुमान लाभला. मा. डॉ. विकास आमटे, मा. सौ. पल्लवी आमटे, मा. श्री एकनाथ डवले, मा. श्री सुनंदन लेले यांच्या उपस्थितीत मिळालेला हा सन्मान निश्चितच पुढील कामासाठी नवी ऊर्जा आणि प्रेरणा देणारा आहे. या निमित्ताने आनंदवनाचा विचार, तिथलं कार्य आणि सेवाव्रतींचं आयुष्य अधिक जवळून अनुभवता आले.

# भिवंडी पालिका प्रशासन बकरीदसाठी पूर्ण व्यवस्थेसह सज्ज

## कुर्बानीसाठीच्या जनावरांची वैद्यकीय तपासणी करण्याचे महापालिकेचे आवाहन

महाराष्ट्र जीत

**भिवंडी,(सुनील झळके)** : भिवंडी महानगरपालिका प्रशासनाने बकरीद सणासाठी सर्व आवश्यक तयारी पूर्ण केली आहे. २७ मे पासून सुरू होणाऱ्या या सणासाठी महानगरपालिका प्रशासन पूर्णपणे सतर्क आणि सज्ज आहे. हा सण शहरात तीन दिवस साजरा केला जाईल. महानगरपालिका आयुक्त अनमोल सागर यांनी आतापर्यंत कुर्बानी केंद्रे, स्वच्छता, पाण्याची उपलब्धता, कचरा विल्हेवाट, पशुवैद्यकीय तपासणी आणि कायदा व सुव्यवस्था यांच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी तीन बैठका घेतल्या आहेत. प्रशासनाने शहरात अधिकृत कुर्बानी केंद्रे निश्चित केली असून, नागरिकांना केवळ त्याच केंद्रांवर जनावरांची कुर्बानी देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

महापालिका आयुक्तांनी घेतलेल्या आढावा बैठकांमध्ये, कुर्बानी केंद्रे, तेथे पुरविल्या जाणाऱ्या मूलभूत सुविधा, कचरा उचलण्यासाठी कर्मचारी व गाड्यांची नियुक्ती, स्वच्छतेसाठी पाण्याच्या टँकरची तरतूद, कुर्बानी केंद्रांच्या परवानगीसाठी स्वतंत्र कक्ष सुरू करणे, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस विभागाशी समन्वय, म्हाडा कॉलनीत शेळी बाजार उभारण्याची व्यवस्था, कुर्बानीच्या दिवशी जनावरांची तपासणी करण्यासाठी पशुवैद्यकीय डॉक्टरांची नियुक्ती आणि कुर्बानीसाठीच्या जनावरांचे शुल्क इत्यादी महत्त्वाच्या विषयांचा आयुक्तांकडून आढावा घेण्यात आला.




जवळच्या रहिवाशांना होणारा त्रास टाळण्यासाठी, जनावरांचा कचरा गोळा करणाऱ्या वाहनांवर कर्मचारी तैनात करण्याचे आणि प्रत्येक फेरीनंतर कचरा पुरण्याच्या ठिकाणी जंतुनाशक फवारणी करण्याचे निर्देश आरोग्य विभागाला देण्यात आले आहेत. बकरीदसाठी निश्चित केलेल्या बळी केंद्रांची यादी लवकरच प्रसिद्ध केली जाईल. या केंद्रांवर नियुक्त केलेल्या पशुवैद्यकांकडून जनावरांची तपासणी करून घेतल्यानंतरच बळी द्यावा, असे आवाहन प्रशासनाने सर्वांना केले आहे. आवश्यक तपासणी शुल्क भरून प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. स्वच्छता आणि आरोग्य लक्षात घेऊन, सरकारने बळी देणाऱ्या केंद्रांच्या सर्वसमावेशक यादीसाठी विनंतीही केली आहे.

कुर्बानी सेंटरवर दुर्गंधी व अस्वच्छता होऊ नये याकरिता, महानगरपालिका प्रशासनाने विशेष व्यवस्था केली आहे. बळी दिल्यानंतर तात्काळ स्वच्छतेसाठी ३५ पाण्याचे टँकर तैनात करण्यात आले आहेत. कचरा उचलण्यासाठी आणि त्याची विल्हेवाट लावण्यासाठी २०० टेम्पो आणि डम्पर, १७ जेसीबी, ३ क्रेन आणि पशुवैद्यकीय डॉक्टरांसाठी १३ वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. कचरा विल्हेवाटीच्या ठिकाणी नियमितपणे औषध फवारणी करण्याचे निर्देश आरोग्य विभागाला देण्यात आले आहेत, जेणेकरून जवळपास राहणाऱ्या लोकांना कोणत्याही प्रकारच्या त्रासाला सामोरे जावे लागणार नाही. याशिवाय, बळी देण्यापूर्वी पशुवैद्यकीय डॉक्टरांकडून जनावरांची तपासणी केली जाईल. प्रशासनाने सर्व नागरिकांना आवाहन केले आहे. आणि परवानाधारकांना उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून आणि कायदा व सुव्यवस्था राखून शांततापूर्ण वातावरणात बकरीद साजरी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## प्रभाग समिती अध्यक्षांची निवडणूक बिनविरोध

### काँग्रेस आणि भाजपचे प्रत्येकी दोन आणि राष्ट्रवादी काँग्रेस (सपा) चे एक उमेदवार

महाराष्ट्र जीत

**भिवंडी,(सुनील झळके)** : भिवंडी महापालिकेच्या पाचही प्रभाग समित्यांच्या अध्यक्षपदाची निवडणूक बिनविरोध पार पडली. ज्यामध्ये भाजप आणि काँग्रेसचे प्रत्येकी दोन नगरसेवक आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा एक नगरसेवक अध्यक्षपदी निवडून आला. ज्यामध्ये प्रभाग समिती क्रमांक 1 चे अध्यक्ष हसनैन फारुकी - राष्ट्रवादी (एसपी), प्रभाग समिती क्रमांक 2 चे अध्यक्ष - तबस्सुम झाकीर बेग काँग्रेस, प्रभाग समिती क्रमांक 3 चे अध्यक्ष - रंजिता मोहन कोंडा भाजप, प्रभाग समिती क्रमांक 4 च्या अध्यक्षा समीना मोहम्मद इम्रान अन्सारी काँग्रेस आणि प्रभाग समिती क्रमांक 5 चे अध्यक्ष ॲड. वैभव एकनाथ



भोईर - भाजप निवडून आले आहेत.ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी भिवंडी महानगरपालिका मुख्यालयाच्या सभागृहात निवडणूक प्रक्रिया संपन्न झाली. नामनिर्देशनपत्र दाखल करताना, विभागीय समिती क्रमांक १, २ आणि ४ साठी प्रत्येकी एकच नामनिर्देशनपत्र दाखल झाले होते. परिणामी, प्रभाग समिती क्रमांक १, २ आणि ४ चे अध्यक्ष बिनविरोध निवडून आले. प्रभाग समिती क्रमांक ३ साठी दोन आणि प्रभाग समिती क्रमांक ५ साठी तीन नामनिर्देशनपत्रे दाखल झाली होती. तथापि, नामनिर्देशनपत्र मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या कालावधीत, शिवसेनेचे संजय भोईर यांनी प्रभाग समिती क्रमांक ३ मधून आपले नामनिर्देशनपत्र मागे घेतले, ज्यामुळे भाजपच्या नगरसेविका रंजिता मोहन कोंडा बिनविरोध विजयी घोषित झाल्या. त्याचप्रमाणे, प्रभाग समिती क्रमांक ५ मध्ये दोन उमेदवारांनी आपले नामनिर्देशनपत्र मागे घेतल्यानंतर, भाजपचे नगरसेवक ॲड. वैभव एकनाथ भोईर हे अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवडून आले.

प्रभाग समिती क्रमांक 1 - हसनैन फारुकी - राष्ट्रवादी (एसपी)

प्रभाग समिती क्रमांक 2 - तबस्सुम झाकीर बेग - काँग्रेस

प्रभाग समिती क्रमांक 3 रंजिता मोहन कोंडा भाजपा

प्रभाग समिती क्रमांक 4 - समिना मोहम्मद इम्रान अन्सारी - काँग्रेस

प्रभाग समिति क्रमांक 5-ऐड. वैभव एकनाथ भोईर - बीजेपी

## राष्ट्रवादी काँग्रेस (सपा) पक्षाच्या ॲड. ईशा खान

### भिवंडी महानगरपालिका स्थायी समितीच्या अध्यक्षपदी, शिवसेना शिंदे गटाचा पराभव

महाराष्ट्र जीत

**भिवंडी,(सुनील झळके)** : राष्ट्रवादी काँग्रेस (सपा) पक्षाच्या सेक्युलर फ्रंटच्या नगरसेविका ॲड. ईशा इम्रान खान यांची भिवंडी महानगरपालिका स्थायी समितीच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. त्यांनी शिवसेना (शिंदे गट) उमेदवार अस्मिता प्रभुदास नाईक यांचा चार मतांनी पराभव केला. भाजपच्या नगरसेविका गीता बिठोबा नाईक यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला होता.

ही निवडणूक ठाणे जिल्हा परिषदेचे पीठासीन अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव यांच्या उपस्थितीत पार पडली. स्थायी समिती अध्यक्षपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (सपा) ईशा इम्रान खान, भाजपच्या गीता विठोबा नाईक आणि शिवसेनेच्या (शिंदे



गट) अस्मिता प्रभुदास नाईक यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी असलेल्या १५ मिनिटांच्या कालावधीत, भाजपच्या गीता विठोबा नाईक या गट नेते संतोष शेट्टी यांच्यासोबत सभागृहात पोहोचल्या आणि त्यांनी पीठासीन अधिकाऱ्यांकडे आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्याचे पत्र सुपूर्द केले.यानंतर, हात वर करून झालेल्या मतदानात ईशा इम्रान खान यांना काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (सपा) आणि भिवंडी विकास आघाडीचे जावेद दळवी यांच्यासह आठ सदस्यांचा पाठिंबा मिळाला. तर अस्मिता प्रभुदास नाईक यांना शिवसेना शिंदे गट, समाजवादी पक्ष आणि कोणार्क विकास आघाडीचे मयुरेश पाटील यांच्यासह केवळ चार सदस्यांचा पाठिंबा मिळाला. उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर भाजपच्या गीता नाईक आणि संतोष शेट्टी सभागृहातून निघून गेले. तर सदस्य सुमित पाटील आणि सुहास नाकाटे सभागृहात पोहोचले नाहीत.

**स्थायी समितीमधील धर्मनिरपेक्ष आघाडीचा हा विजय खासदार सुरेश म्हात्रे, आमदार रईस शेख, राष्ट्रवादी काँग्रेस (सपा)चे शहर अध्यक्ष शोएब खान गुड्डू, महापौर नारायण चौधरी आणि माजी उपमहापौर इम्रान खान यांच्या राजकीय रणनीतीचा विजय आहे. सर्वांनी माझ्यासारख्या नवीन सदस्यावर विश्वास व्यक्त केला आहे. मी विशेषतः शहर विकास कामांना गती देण्यावर लक्ष केंद्रित करेन आणि येत्या काळात स्थायी समितीच्या माध्यमातून विकास कामे वेगाने पूर्ण केली जातील.**

**- ॲड. ईशा खान, अध्यक्ष, स्थायी समिती**

## अर्नाळा येथील कारवाईबाबत पालघर जिल्हा प्रशासनाचे स्पष्टीकरण

### पारंपरिक मच्छीमारांच्या संरक्षणाचा पुनरुच्चार

महाराष्ट्र जीत

**पालघर** : अर्नाळा येथे नुकत्याच करण्यात आलेल्या अतिक्रमण निष्कासन कारवाईबाबत काही सोशल मीडिया पेजेस व माध्यम संस्थांकडून प्रसारित करण्यात येणारी दिशाभूल करणारी व चुकीची माहिती लक्षात घेऊन पालघर जिल्हा प्रशासनाकडून हे स्पष्टीकरण देण्यात येत आहे. प्रशासनाने पुनरुच्चार केला आहे की, सर्व कारवाई पूर्णपणे कायदेशीर चौकटीत राहून करण्यात आली असून पारंपरिक मच्छीमार समाजाच्या हक्कांचे संरक्षण करणे हेच प्रशासनाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.

अधिकृत अभिलेखांनुसार, सर्वे क्रमांक ४४ आणि ४५ ही जमीन 'शासकीय गुरचरण' म्हणून वर्गीकृत आहे. या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरील इतर हक्कांमध्ये ही जमीन पारंपरिक मच्छीमार समाजासाठी मासळी सुकविणे, बोटींची दुरुस्ती आणि बोट बांधणी यांसारख्या कामांसाठी आरक्षित असल्याचे स्पष्टपणे नमूद आहे. अतिक्रमणांबाबतच्या असंख्य तक्रारींनंतर मत्स्य विभाग, महसूल विभाग आणि भूमी अभिलेख विभाग यांच्या वतीने संयुक्त पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान असे दिसून आले की, काही मच्छीमारांनी मासळी सुकवण्यासाठी ओटे, शेड्स आणि तात्पुरती बांधकामे उभारली होती. मात्र, काही विशिष्ट क्षेत्रांमध्ये काही व्यक्ती आणि गटांकडून निवासी बांधकामे आणि अनधिकृतरीत्या भाजीपाला लागवड केली जात होती.

ही संयुक्त निष्कासन मोहीम १३ मे, २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता मत्स्य विभाग आणि पोलीस प्रशासनाच्या उपस्थितीत सुरू झाली. या कारवाईदरम्यान, सर्वे क्रमांक ४५ मधील ३२ अनधिकृत बांधकामे हटवण्यात आली आणि सर्वे क्रमांक ४४ मधील १२ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली. याशिवाय, १८ अतिक्रमणधारकांनी स्वतःहून आपली अतिक्रमणे काढून टाकली.

पालघर जिल्हा प्रशासन पारंपरिक मच्छीमार आणि पात्र रहिवाशांच्या उपजीविकेचे आणि हक्कांचे संरक्षण करण्यासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहे. बेकायदेशीर व्यावसायिक अतिक्रमणे आणि जमीन बळकावणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध कारवाई करण्याच्या निर्णयावर प्रशासन ठाम असले तरी, कोणत्याही पात्र रहिवाशाला किंवा पारंपरिक मच्छीमाराला अन्यायकारकपणे हटवले जाणार नाही.

सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या व्हिडिओंबाबत जिल्हा प्रशासनाचे असे म्हणणे आहे की, हे व्हिडिओ केवळ दिशाभूल करणारे तुकडे (snippets) आहेत आणि ते मच्छीमार समाजाच्या उपजीविकेसाठी आरक्षित असलेल्या जमिनीवरील बेकायदेशीर अतिक्रमणांचे संपूर्ण वास्तव दर्शवत नाहीत. प्रत्येक बांधकामाची पारदर्शकता, संवेदनशीलता आणि महाराष्ट्र शासनाच्या नियमितीकरण धोरणानुसार सखोल पडताळणी केली जात आहे.

प्रशासनाने पुढे स्पष्ट केले आहे की, भविष्यातील कोणतीही कारवाई ही सविस्तर पडताळणी आणि योग्य वर्गीकरणानंतरच केली जाईल, ज्यामध्ये पारंपरिक मच्छीमार समाजाच्या उपजीविकेचे रक्षण करण्यास सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल.

महसूल अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांना शासकीय जमिनीवर कोणतेही नवीन अनधिकृत बांधकाम न करण्याच्या सूचना दिल्या आहेत. चुकीची आणि दिशाभूल करणारी माहिती पसरवण्याच्या प्रकारांची प्रशासनाने गंभीर दखल

# लोककवी वामनदादा कर्डक

महाराष्ट्र जीत

महाराष्ट्राचे लोककवी, शाहीर, आंबेडकरी चळवळीचे बुलंद कार्यकर्ते आणि समाज प्रबोधनकार वामन तबाजी कर्डक यांची १५ मे रोजी २२ वि पुण्यतिथी होती. त्यांच्या २२ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारा हा विशेष लेख.

वामनदादा कर्डक यांचा जन्म १५ ऑगस्ट १९२२ रोजी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील देशपंडी या छोट्याशा खेड्यात एका गरीब कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव तबाजी तर आईचे नाव सईबाई असे होते. त्यांना एक मोठा भाऊ आणि एक धाकटी बहीण होती. वामनदादा यांच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना शिक्षण घेता आले नाही. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने उदरनिर्वाहासाठी दादा मिळेल ती कामे करू लागले. जत्रा यात्रांमधून कुस्ती खेळू लागले त्यातून जे पैसे मिळत त्यातून ते घरखर्च चालवू लागले. वयाच्या



विसाव्या वर्षी त्यांचे लग्न झाले पण त्यांना कौटुंबिक स्वास्थ्य लाभले नाही. त्यांच्या पत्नीचे अकाली निधन झाले पुढे मुलाचेही निधन झाले. इतके मोठे दुःख उराशी बाळगून त्यांनी मुंबई गाठली. मुंबईत त्यांनी गिरणी कामगार म्हणून काम केले. बीडीडी चाळीत त्यांचे वास्तव्य असे तिथेच त्यांची सैनिक समता दल आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांशी ओळख झाली. समता सैनिक दलातर्फे डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या सभेचे आयोजन करण्यात त्यांचा पुढाकार असायचा. वामनदादांना लहानपणापासून गायनाची आवड होती. त्यांना मिळालेली प्रतिभा ही जन्मदत्त देणगी होती. लहानपणापासून गायनाची आवड असलेल्या वामनदादांकडे लेखणी, वाणी आणि संगीत यांचा त्रिवेणी संगम होता. एक दिवस फावल्या वेळेत ते राणीच्या बागेत बसले असताना त्यांनी एका हिंदी चित्रपट गीताचे विडंबन केले. ते गीत त्यांनी राणीच्या बागेतील गर्दीपुढे म्हटले. त्यांचे हे विडंबन गीत उपस्थित लोकांना खूप आवडले. त्यांचा आवाज आणि गाण्याचे बोल लोकांना आवडू लागले. पुढे ते आंबेडकरी जलशांमध्ये गाऊ लागले. विशेषतः ज्या ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण असे त्याठिकाणी बाबासाहेबांच्या भाषणाआधी वामनदादांचे गाणे होत असे. बाबासाहेबांनी त्यांच्या गाण्याची स्तुती अनेकवेळा आपल्या भाषणांमधून केली आहे. बाबासाहेब म्हणत माझ्या दहा भाषणांचं काम शाहिरांचं एक गाणे करते. वामनदादांचे बहुतांश गीते हे लोकगीते आहेत. वामनदादांची गीते म्हणजे कोंडलेल्या मनाचा हुंकार. वामन दादांच्या गीतांचा केंद्रबिंदू हा मानव होता म्हणूनच वामनदादा म्हणतात मानवा इथे मी तुझे गीत गावे.... तुझे गीत व्हावे मानवता. आंबेडकर भक्ती, दलित, शोषित, स्त्रीमुक्ती, जातीव्यवस्था यावर वामन दादांनी आपल्या गीतातून प्रबोधन केले. दादांनी आपल्या गीतातून हुंडाबळी, ऊसतोड कामगार, पर्यावरण, कामगार, शेतकऱ्यांचे प्रश्न, दुष्काळ यावरही भाष्य केले. त्यांच्या गीतांचे प्रेरणास्थान डॉ बाबासाहेब आंबेडकर हेच होते. वामन दादांनी स्वतःला भीमकार्यात वाहून घेतले. दादांनी आपल्या असंख्य लोकगीतांतून लोकांना भुरळ घातली. म्हणूनच ते लोककवी झाले. दादांनी आयुष्यभर आंबेडकरी विचारांची पताका आपल्या खांद्यावर खंबीरपणे वाहिली. आपल्या तेजस्वी लेखणीने आणि कणखर वाणीने फुले, शाहू, आंबेडकर घराघरांत पोहचवणाऱ्या या महाकवीचे १५ मे २००४ रोजी निधन झाले. लोककवी वामन दादा कर्डक यांना २२ व्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार